# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २२/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत बेल्दा गावाजवळ वाहनारी तुंडिया नदीचे पात्र येथे दिनांक १९/०७/२२ चे १०.००वा ते दि. २१/०७/२२ चे ०७.०० वा. चे सुमारास फिर्यादी हिचे वडील **हरिचंद छोटेलाल वरकडे (मृतक), वय ६५ वर्ष, रा .बेल्दा** हे दि. १९/०७/२०२२ चे सकाळी १०.०० वा. चे सुमारास आपल्या म्हशीला शेतीकडे चारण्यासाठी बेल्दा गावाजवळ वाहनारी तुंडिया नदीच्या जवळ गेले होते. त्यादरम्यान ते आपल्या म्हशी आणण्याकरिता उतरून नदी ओंलाडुन जात असता ते घरी परत न आल्याने फिर्यादिचे रिपोर्ट वरून दि. २०/०७/२०२२ रोजी पोस्टे. देवलापार येथे मिसिंग क्र. १५/२२ अन्वये दाखल आहे. आज दि. २१/०७/२०२२ रोजी ७.०० वा दरम्यान मृतक याचे प्रेत तुडिया नदीच्या पात्रात दिसुन आले. मृतक हा म्हशी आणण्याकरीता नदीच्या पात्रात उतरून नदी ओलांडुन जात असतांना तो पाण्यात बुडुन मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कंचलता राखीचंद मरसकोल्हे, वय ३९ वर्ष, रा. म्हाडा कॉलनी नारी रोड नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार अशोक उईके मो.नं. ७७२०८२४६२९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील २०/०७/२०२२ चे सकाळी २१.३० वा. येथे सुमारास **हिरामण सदाशिव मुरसकर(मृतक), वय ४० वर्ष रा. सोनेगाव ता. कुही ह.मु. जिजामाता नगर खरबी, नागपुर** हा दारू पिण्याचा सवयीचा असुन दि. २०/०७/२०२२ चे सकाळी ०९/०० ते १०/०० वा. चे दरम्यान तो दारू पिऊन बेशुध्द अवस्थेत आर्या बार भिवापुर जवळ मिळुन आला. त्यास उपचारा करीता पो.स्टे. भिवापुरचे पोलीस अंमलदार यांनी ग्रामीण रूग्णालय भिवापुर येथे नेले तेथुन रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुंर येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन दि. २०/०७/२०२२ चे दुपारी १२.४४ वा. मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे मेडीकल पोनिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री प्रकाश चंनगोले मो.नं. ७९७२४४१८४६ हे करीत आहे.

३) पो.स्टे. कन्हान :– दिनांक १२/०७/२०२२ चे १८.१७ वा. सुमारास अनोळखी महीला मृतक वय अंदाजे ७५ वर्ष ही कन्हान तारसा फाटाजवळ फुटपाथावर बेशुध्द अवस्थेत पडलेली होती. तिला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता उपचारादरम्यान दि. २०/०७/०२२ रोजी ११.१५ वा. दर. डॉक्टरांनी तपासुन मृत घोशीत केले. तरी प्रेताचे मेयो येथुन पी.एम. करुन पो.स्टे. कन्हान ला कागदपत्रे प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला.

सदर प्रकरणी सर तर्फे नजीर कुरेशी मेयो पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि श्री फुलझले मो.क्र. ९४०४१२३९५० हे करीत आहे.

## अनोळखी पुरूषाचा प्रेत

पो.स्टे. बेला :– आज दिनांक २२/०७/२०२२ रोजी यातील **मृतक– अनोळखी पुरूष, वय अंदाजे २५ ते ३० वर्ष** याचे प्रेत हे चिमणाझरी शिवारातील आश्रम शाळेच्या पाठीमागील नाल्यात मिळून आले आहे. सदर प्रेताला अज्ञात आरोपीने रस्सीचे सहायाने पोटाला दगड बांधून त्याला चिमणाझरी शिवारातील आश्रम शाळेच्या पाठीमागील नाल्यात पूरावा नष्ट करण्याचे उद्देशाने फेकून दिले आहे.

**मृतकाचे वर्णन:–**

पुरुष वय अंदाजे २५ ते ३० वर्ष, रंग– काळा सावळा, अंगात कपडे लाल रंगाची हॉप टी शर्ट ज्यावर इंग्रजीत Volleyball असे लीहले आहे व निळ्या रंगाची अंडरविअर घातलेला आहे. याबाबत कुणीही ओळखत असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) पोलीस स्टेशन बेला, नागपूर ग्रामीण फोन क्र. ०७११६२७८५२६

२) सपोनी पंकज वाघोडे मो. क्र. ७३०४२१०७२४

४) सपोउपनि अजय चौधरी मो. क्र. ९०२२८४९५८०

३) पोउपनि राहुल ठेंगणे मो. क्र. ७९७२८१२५६९.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर